महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५ बी. जे.रोड, पुणे - ४११००१.
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७, ईमेल :- commaudit19@gmail.com

जा.क्र. सआ.-१९/ लेप.-३/ दोष दुरुस्ती अह./कार्यवाही/ ६५९ /२०२४, दिनांक - १२/०४/२०२४

**कलम ८२ अन्वये सहकारी संस्थांचे दोष दुरुस्ती अहवालावरील कार्यवाहीबाबत सर्वसमावेशक सुचना....**

## परिपत्रक

**वाचावे :-**

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ०३
२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८२
३) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ७३

**वाचले :-**

१) या कार्यालयाचे परिपत्रक, जा.क्र./प्रशासन/कलम ८१(१)(ग),८२/परीपत्रक/२५४/२०१५, दि.२२/०८/२०१५.
२) या कार्यालयाचे परिपत्रक, जा.क्र. सआ/लेखापरीक्षण/ दोष दुरुस्ती अह./२०८९/२०१७, दि. ११/०८/२०१७.
३) या कार्यालयाचे पत्र, जा.क्र.सआ./लेप.१९(२)/वा.लेप.नोंदवही/११३९/२०२२, दि.२२/०९/२०२२.
४) या कार्यालयाचे परिपत्रक, जा.क्र. सआ.-१९/ लेप.-३/वै.लेप./अहवाल छाननी/ ६८४/२०२३, दि. २८/०६/२०२३

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८२ अन्वये सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालातील दोषांच्या दुरुस्तीची तरतूद आहे. राज्यातील एकूण लेखापरीक्षण पुर्ण झालेल्या सहकारी संस्थांच्या प्रमाणात लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल प्राप्ती व त्यावरील सहकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित निबंधकांकडुन करण्यात येणारी कार्यवाही अल्प प्रमाणात होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे लेखापरीक्षण अहवालातील दोष पुर्तता वेळचे वेळी न झाल्याने त्याच त्या दोषांची पुनरावृत्ती पुढील आर्थिक वर्षामध्ये होत असल्याचे सुध्दा दिसुन येत आहे. सदरची बाब सहकारी संस्थांच्या व संस्था सभासदांच्या आर्थिक, सामाजिक हितास बाधा पोहोचवणारी आहे. अशा प्रकारच्या दोषांच्या पुनरावृत्तीमुळे संबंधित सहकारी संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कलम ८२ मधील तरतुदीनुसार संबंधित संस्थांच्या प्रत्येक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालामधील दोषांच्या दुरुस्तीवर वेळीच लक्ष देणे आवश्यक झालेले आहे.

वरील वाचले क्र. १ ते ४ अन्वये सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती व त्या अनुषंगिक बाबींचे दृष्टीने वेळोवेळी सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. लेखापरीक्षण अहवालाचे दोष

दुरुस्ती कामकाज काटेकोरपणे करणेबाबत निदेश दिलेले असतांनाही, राज्यातील लेखापरीक्षण अहवालाचे दोष दुरुस्ती अनुषंगिक कामकाज सहकार अधीनियमातील संबंधीत तरतुदीनुसार वेळचेवेळी, परिणामकारकरित्या व प्रभावीपणे होत नसल्याचे दिसुन येत आहे. यास्तव लेखापरीक्षण अहवालातील दोष दुरुस्ती अनुषंगिक कामकाज सहकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेळचेवेळी, परिणामकारकरित्या व अधिक प्रभावीपणे होण्यासाठी अधिकच्या सर्वसमावेशक परिपत्रकीय सुचना निर्गमित करणे आवश्यक झालेले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, वाचले क्र. १ अन्वये निर्गमित दि. २२/०८/२०१५ चे परिपत्रकामधील सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची स्विकृती व त्यापुढील कार्यवाही अनुषंगाने दिलेल्या संबंधित सुचना अधिक्रमित करण्यात येत आहे. मात्र सदर परिपत्रकातील लेखापरीक्षण अहवालाची स्विकृती व त्यापुढील कार्यवाही बाबतच्या सुचना कायम ठेवण्यात येत आहेत. तसेच वाचले क्र. २ अन्वये निर्गमित दि.११/०८/२०१७ चे परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत असुन, राज्यातील सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती व अनुषंगिक कामकाजाचे दृष्टीने खालील प्रमाणे सर्वसमावेशक सुधारित परिपत्रकीय सुचना वजा निदेश देण्यात येत आहेत.

**सहकारी अधिनियम १९६० चे कलम ८२ मधील तरतुद -**

**"८२. (१) जर लगतपूर्ववर्ती कलमान्वये केलेल्या लेखापरीक्षेच्या निकालामध्ये संस्थेच्या कामकाजात कोणतेही दोष असल्याचे उघड केले असले तर, संस्था, लेखापरीक्षा अहवालाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, लेखापरीक्षकाने किंवा लेखापरीक्षा करणा-या व्यवसाय संस्थेने दाखवून दिलेले दोष किंवा नियमबाहयता याबाबत निबंधकाकडे स्पष्टीकरण देईल आणि दोष दुरूस्त करण्यासाठी पावले उचलेल व नियमबाह्यता दुर करण्यासाठी उपाययोजना करील, आणि त्यावर संस्थेने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, निबंधकाला सादर करील आणि तो, पुढील सर्वसाधारण सभेपुढे ठेवील. निबंधक, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत असे दोष दूर करण्याच्या दृष्टीने, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी कारवाई करण्यासाठी, अशा संस्थेस किंवा तिच्या अधिका-यांस निर्देश देणारा आदेश देखील काढू शकेल.**

**(२) निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती, लेखापरीक्षा दुरूस्ती अहवालाची छाननी करेल आणि त्यानुसार, असा अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत अशा अहवालाविषयी संस्थेला कळवील.**

**(३) संस्थेकडून संपूर्ण दुरूस्ती करण्यात येईपर्यंत, संस्थेच्या दुरूस्ती अहवालावर, त्याचे, किंवा यथास्थिती, तिचे बाबनिहाय अभिप्राय देणे आणि आपला अहवाल निबंधकाला सादर करणे ही संबंधित लेखापरीक्षकाची किंवा लेखापरीक्षा करणा-या व्यवसाय संस्थेची जबाबदारी असेल.**

**(४) जर संस्था, लेखापरीक्षा दुरूस्ती अहवाल निबंधकास व वार्षिक सर्वसाधारण सभेपूढे सादर करण्यास कसूर करील तर, निबंधक आदेशाव्दारे निबंधकास व वार्षिक सर्वसाधारण सभेपूढे लेखापरीक्षा दुरूस्ती अहवाल सादर करणे ज्याचे कर्तव्य होते, आणि जो, वाजवी कारणांशिवाय उपरोक्त कृती करण्यात कसूर करील, त्या समितीच्या कोणत्याही पदाधिका-याला किंवा यथास्थिती, सदस्याला, अशा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे, पाच वर्षापेक्षा अधिक नसेल अशा कालावधीकरीता अशा समितीचा कोणताही पदाधिकारी किंवा सदस्य म्हणून निवडून येण्याकरीता किंवा समितीचा कोणताही पदाधिकारी किंवा सदस्य होण्याकरीता, अनर्ह ठरवू शकेल, आणि जर असा पदाधिकारी, संस्थेचा सेवक असेल तर, त्याच्यावर पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेची शास्ती लादू शकेल.**

**परंतू, या पोट कलमाअन्वये असा आदेश काढण्यापूर्वी, निबंधक, संबंधित व्यक्तीला, त्याच्या विरुध्द हाती घेण्याचे प्रस्तावित केलेल्या कारवाई विरूध्द कारणे दाखविण्याची वाजवी संधी देईल किंवा देण्याची व्यवस्था करील."**

राज्यातील सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची स्विकृती व दोष दुरुस्ती अहवाल प्राप्तीसाठी पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने सर्व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था

यांनी निबंधकाच्या वतीने खालीलप्रमाणे कामकाजाचे नियोजन करावयाचे असुन, त्याप्रमाणे कार्यवाही पुर्ण करणे करिता सर्व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था यांना प्राधिकृत करणेत येत आहे.

**१) जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था यांनी करावयाचे कामकाजाबाबत :-**

कलम ८२ अन्वये निबंधकाचे वतीने जिल्हानिहाय दोष दुरुस्ती अहवालाची स्विकृती व त्यावरील पुढील कार्यवाही बाबत अभिप्रेत कामकाज पुर्ण करण्याच्या दृष्टीने जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. जिल्ह्यातील सर्व पात्र सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण पुर्ण करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. लेखापरीक्षण पूर्ण संस्थांचे दोष दुरूस्ती अहवाल विहीत मुदतीत संबंधित संस्थांनी संबंधित लेखापरीक्षकाकडे अभिप्राय नोंदविणेसाठी सादर केल्याची सुनिश्चिती करावी.

२. सर्व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था यांनी दोष दुरुस्ती अहवाल छाननी वाटप कामकाज आपले स्तरावरुन अधिनस्त अधिकारी व कर्मचारी वर्गामध्ये परिपत्रकीय सुचना विचारात घेऊन करावे.

३. संबंधित लेखापरीक्षकाने दोष दुरुस्ती अहवालावर अभिप्राय नोंदवून, संबंधित निबंधक/ जिल्हा विशेष लेखापरीक्षक कार्यालयास सादर केलेल्या दोष दुरुस्ती अहवालाची छाननी करुन, कलम ८२ मधील तरतुदीनुसार ज्या दोषांची पुर्तता झाली नाही, अशा दोषांचा संस्थानिहाय अहवाल पुढील कार्यवाहीस्तव संबंधित निबंधकांना सादर करावा.

४. दोष दुरूस्ती अहवालाबाबत, लेखापरीक्षण पुर्ण संस्थांपैकी लेखापरीक्षकांकडे दोष दुरुस्ती अहवाल सादर केलेल्या संस्थांची संख्या, दोष दुरुस्ती अहवाल सादर न केलेल्या संस्थांची संख्या, संस्थेने सादर केलेल्या दोष दुरुस्ती अहवालावर संबंधित लेखापरीक्षकांनी आपले अभिप्राय नोंदवून संबंधित निबंधकांकडे दोष दुरुस्ती अहवाल सादर केलेल्या संस्थांची संख्या, अभिप्राय नोंदवुन दोष दुरुस्ती अहवाल जिल्हा विशेष लेखापरीक्षकाकडे सादर न केलेल्या संस्थांची संख्या इत्यादी बाबत संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षकांनी वेळोवेळी आढावा घेवुन, पाठपुराव्याने आवश्यक कार्यवाही पुर्ण करावी. तसेच सदरहू दोष दुरूस्ती अहवाल सादर करणेबाबत संबंधित सहकारी संस्था व संबंधित लेखापरीक्षक यांचेकडे पाठपुरावा करावा. योग्य त्या पाठपुराव्याअंती ज्या सहकारी संस्था व लेखापरीक्षक उचित प्रतिसाद न देता दोष दुरुस्ती अहवाल सादर करणार नाहीत, अशा संस्था व लेखापरीक्षकांची सूची संबंधित निबंधकास जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी सहकार अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाहीस्तव सादर करावी.

५. दोष दुरुस्ती अहवाल छाननी अंती जिल्हा विशेष लेखापरीक्षका मार्फत प्रत्यक्षात दोष पुर्तता न झालेल्या दोषांचा संस्थानिहाय अहवाल पुढील कार्यवाहीस्तव संबंधित निबंधकांना सादर करण्यात येईल. अशा प्राप्त अहवालावर संबंधित निबंधकाने संस्थेस कलम ८२ मधील तरतुदीनुसार निर्गमित केलेल्या निदेशाप्रमाणे संस्थेने दोषांची दुरुस्ती करून विहित कालावधीमध्ये सादर केलेल्या फेर दोष दुरुस्ती अहवालांवर संबंधित लेखापरीक्षकांनी आपले स्पष्ट अभिप्राय नोंदवून सदरचा फेर दोष दुरुस्ती अहवाल जिल्हा विशेष लेखापरीक्षकांना सादर करावयाचा आहे. जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी सदर फेर दोष दुरुस्ती अहवालाची छाननी करुन, निबंधकाने दिलेल्या निदेशास अनुसरुन अद्यापही पुर्तता न झालेल्या दोषांचा संस्थानिहाय अहवाल पुढील कार्यवाहीस्तव संबंधित निबंधकांना पुन:श्च सादर करावा.
**(सोबत लेखापरीक्षण अहवाल दोष दुरुस्ती छाननी अहवालाचा नमुना)**

६. सहकारी संस्थाचे लेखापरीक्षण अहवालातील दोषांची संपूर्ण दुरूस्ती करेपर्यंत, संस्थेच्या दोष दुरुस्ती अहवालावर आपले बाबनिहाय अभिप्राय देणे आणि निबंधकाच्या वतीने प्राधिकृत केलेल्या जिल्हा विशेष लेखापरीक्षकास आपला दोष पुर्ततेबाबत स्पष्ट अभिप्राय नोंदविलेला अहवाल सादर करणे ही संबंधित लेखापरीक्षकाची जबाबदारी आहे. त्यामुळे संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षकांनी संस्थेच्या संपूर्ण दोषांची दुरूस्ती होत असल्याची व संस्थेचे लेखापरीक्षण करणारे संबंधित लेखापरीक्षक संस्थानिहाय दोष दुरुस्ती अहवालावर वेळोवेळी परिपत्रकीय सुचनांनुसार वस्तुनिष्ठ अभिप्राय नोंदवित असल्याची सुनिश्चिती करावी.

७. लेखापरीक्षण अहवालाद्वारे लेखापरीक्षकांनी निर्देशनास आणुन देण्यात आलेल्या, दोषांची दोष दुरुस्ती करण्यात किंवा निबंधकाने दिलेल्या निदेशाप्रमाणे दोष दुरुस्ती करण्यात संस्थेने कसूर केल्यास जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी असे दोष दुरुस्त करुन घेण्यासाठीच्या उपाय योजनेस्तव कलम ८७(४) मधील तरतुदी प्रमाणे उचित कार्यवाहीस्तव प्रस्ताव संबंधित निबंधकास सादर करावा.

८. संस्थेचे संबंधित अधिकारी व पदाधिकारी यांनी, त्यांचे संस्थेच्या मागील वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे कलम ७५ (२) (सात), कलम ७५(४) अन्वये सादर करणे आवश्यक आहे. कलम ७५ (५) अन्वये संस्थेच्या ज्या अधिकाऱ्यांनी किंवा समिती सदस्यांनी सदरहू उपबंधाचे पालन न करता आपले कर्तव्यात कसूर केलेला आहे, अशा अधिकारी किंवा समिती सदस्यांविरुध्द कलम ८२(४) मधील तरतुदीनुसार कार्यवाहीस्तव प्रस्ताव संबंधीत निबंधकांकडे सादर करावा.

९. ज्या संस्था दोष दुरुस्ती अहवाल अनुषंगिक कार्यवाही करणार नाहीत, अशा संस्थांच्या सर्व संबंधितांनी कलम १४६ खाली संबंधित अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार ते कलम १४७ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे संबंधित शास्तीस पात्र ठरण्याचे तरतुदीस पूरक संस्थानिहाय कार्यवाहीस्तव प्रस्ताव जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी संबंधित निबंधकाकडे सादर करावा.

१०. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची छाननी व लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल छाननी कामकाज विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), मुंबई विभाग, मुंबई यांनी करावयाचे आहे. सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांचे लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल छाननी कामकाज सबंधित विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) यांनी करावयाचे आहे.

११. वाचले क्र.४ अन्वये राज्यातील वित्तिय सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण अहवाल छाननी बाबत सर्वंकष सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व नागरी व पगारदार सहकारी बँकांचे लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल छाननी कामकाज विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ व वर्ग-२ अधिका-यांकडून करण्यात यावे. राज्यस्तरीय व विभागस्तरीय कार्यक्षेत्र असणाऱ्या संस्थांचे लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल छाननी कामकाज वर्ग-३ कर्मचाऱ्यांकडुन करण्यात येऊ नये.

१२. राज्यस्तरीय व विभागस्तरीय कार्यक्षेत्र असणाऱ्या संस्थांचे मुख्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे, त्या जिल्हा विशेष लेखापरीक्षकांनी स्वतः तसेच त्यांचे जिल्ह्यातील विशेष लेखापरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून संबंधित सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल छाननी कामकाज करावयाचे आहे.

दोष दुरुस्ती अहवालाची छाननी करुन, कलम ८२ मधील तरतुदीनुसार ज्या दोषांची पुर्तता झाली नाही, अशा दोषांचा संस्थानिहाय अहवाल पुढील कार्यवाहीस्तव विभागीय स्तरीय संस्थांचे बाबतीत संबंधित विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व राज्यस्तरीय संस्थांचे बाबतीत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयास सादर करावा.

१३. ज्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी ज्या सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची छाननी कामकाज केलेले आहे, त्याच अधिकारी /कर्मचारी वर्गाकडे शक्यतो, त्या सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल दोष दुरुस्ती अहवाल छाननी कामकाज देण्यात यावे.

१४. लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवाल छाननी कामकाज गुणवत्तापूर्ण होणे आवश्यक आहे. सदरचे कामकाज गुणवत्तापुर्ण होण्याच्या दृष्टीने सर्व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी आवश्यक उपाययोजना व कार्यवाही करावी.

१५. लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालात दोष पुर्तता न झालेले गंभीर दोष असतानाही, त्याबाबी दोष पूर्तता न झालेल्या बाबी छाननी अहवालात स्पष्टपणे नमुद न केल्यास व कालांतराने त्याबाबी निदर्शनास आल्यास, त्यास संबंधित दोष दुरुस्ती अहवाल छाननी करणारे संबंधित अधिकारी

/ कर्मचारी जबाबदार राहतील. लेखापरीक्षण अहवाल दोष दुरुस्ती छाननी कामकाज सर्व संबंधितांनी काळजीपुर्वक करणे आवश्यक आहे.

१६. संबंधित विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण), यांनी त्यांचे विभागातील सर्व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग- १, यांचेवर लेखापरिक्षण अहवाल दोष दुरुस्ती अहवाल छाननी कामकाज गुणवत्तापूर्ण व १००% पुर्ण होणेचे दृष्टीने योग्य ते नियंत्रण ठेवून, केलेल्या कामकाजाची संख्यात्मक माहिती दरमहा मासिक माहिती प्रणाली (M.I.S.) द्वारे या कार्यालयास निर्धारित मुदतीत सादर करावी.

**२) दोष दुरुस्ती अहवाल, लेखापरीक्षकांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत :-**

कलम ८२ मधील तरतुदी नुसार, सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवालातील दोषांची संपूर्ण दुरूस्ती करेपर्यत, संस्थेच्या दोष दुरुस्ती अहवालावर आपले बाबनिहाय अभिप्राय देणे आणि आपला अहवाल निबंधकाला सादर करणे ही संबंधित लेखापरीक्षकाची किंवा लेखापरीक्षा करणा-या व्यावसायीक संस्थेची जबाबदारी असेल.

नियम ७३ अन्वये "ओ" नमुन्यातील दोषदुरुस्ती अहवाल प्राप्ती अंती लेखापरीक्षकांनी त्यावर दोषांच्या प्रत्यक्ष पुर्तता / अपुर्ततेस अनुसरुन आपले बाबनिहाय अभिप्राय नोंदवून हा अहवाल संबंधित संस्थेच्या निबंधकास वेळीच सादर करावा.

उपरोल्लेखीत प्रक्रियेद्वारे दोषांच्या स्पष्टींकरणांसह संस्था स्तरावरुन सादर केलेला दोष दुरुस्ती अहवाल लेखापरीक्षकाच्या अभिप्रायासह संबंधित निबंधकास विहित मुदतीत सादर होईल अशी संबंधित लेखापरीक्षकाने दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच लेखापरीक्षण केलेल्या सहकारी संस्थेच्या लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल वेळोवेळी प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लेखापरीक्षकाची आहे. अधिनियमातील संबंधित सर्व प्रकारच्या तरतुदींचे पालन करुनही, तसेच पाठपुरावा करुनही ज्या सहकारी संस्था दोष दुरुस्ती अहवाल सादर करणार नाहीत, अशा संस्थांवर अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाहीस्तव प्रस्ताव संबंधित लेखापरीक्षकांनी संबंधित संस्थेच्या निबंधकाकडे वेळीच सादर करणे अनिवार्य आहे.

वरील प्रमाणे प्राप्त दोष दुरुस्ती अहवालावर संबंधित लेखापरीक्षकांनी दोषांची प्रत्यक्ष पुर्तता विचारात घेऊन, आपले अभिप्राय खालील प्रमाणे स्पष्टपणे नोंदविणे आवश्यक आहे.

**दोष दुरुस्ती अहवालावर अभिप्राय नोंदविणे -**

१. दोषाची पुर्णत: पुर्तता झाल्यास, - **दोषाची पुर्तता झाली.**
२. दोषाची अंशत: पुर्तता झाल्यास, - **दोषाची पुर्णत: पुर्तता नाही.**
३. दोषाची काहीही पुर्तता न झाल्यास, - **दोषाची पुर्तता नाही.**
४. दोष दुरुस्ती अहवालावरुन काही बार्बीबाबत लेखापरीक्षकाला स्पष्ट अभिप्राय नोंदविता येत नाही, (**उदा.** वसुलपात्र रक्कम पुढे वसुल झाली) - **पुढील लेखापरीक्षणाचे वेळी तपासण्यात यावे.**
५. सहकारी संस्थांनी नोंद घेतली, वाचून नोंद घेतली, पुर्तता करण्यात येईल, पुर्तता करीत आहोत, पुढील लेखापरीक्षणाच्या वेळी सादर करण्यात येईल इ. प्रकारची दोष दुरुस्ती केल्यास, लेखापरीक्षकांचे अभिप्राय विचारात घेऊन **सदरची बाब वरील क्र.३ अंतर्गत येईल.**

वरीलप्रमाणे, संबंधित सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाचे अनुषंगाने वेळोवेळी आपली वैधानिक जबाबदारी पार न पाडणारे व आपल्या कर्तव्यात कसूर करणारे संबंधित सनदी लेखापाल भागीदारी संस्था, सनदी लेखापाल, परीव्यय लेखापाल भागीदारी संस्था, परीव्यय लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षक महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ (१) (ग) (सात) मधील तरतुदी नुसार सहकार खात्याच्या लेखापरीक्षकांच्या नामतालिकेवरुन नाव कमी करण्यास पात्र राहतील. तसेच सदर प्रकरणी सहकार खात्यातील लेखापरीक्षक उचित कार्यवाहीस पात्र राहतील. त्यामुळे संबंधित लेखापरीक्षकांनी आपली वैधानिक जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडणे आवश्यक आहे.

**३) दोष दुरुस्ती अहवाल, निबंधकांनी करावयाच्या वैधानिक कार्यवाहीबाबत :-**

१) कलम ८२ व नियम ७३ मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थेने दोषांच्या वस्तूनिष्ठ स्पष्टीकरणांसह सादर केलेल्या दोष दुरुस्ती अहवालावर संबंधित लेखापरीक्षकांनी दोषांच्या प्रत्यक्ष पुर्तता / अपुर्ततेस अनुसरुन बाबनिहाय अभिप्राय नोंदवुन दोष दुरुस्ती अहवाल संबंधित निबंधकास विहित मुदतीत सादर करणे अनिवार्य आहे.

सहकारी अधिनियम व नियमातील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास संबंधित सहकारी संस्थेविरुद्ध संबंधित निबंधकांनी वेळीच वैधानिक कार्यवाही करावी. लेखापरीक्षकांनी कलम ८२ मधील तरतुदीनुसार आपली जबाबदारी पुर्ण न केल्यास संबंधित लेखापरीक्षकाविरुद्ध अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाहीचा प्रस्ताव या कार्यालयास वेळीच सादर करण्यात यावा. सदरची कार्यवाही करण्यापुर्वी कलम ८२ मधील तरतुदीनुसार संबंधित संस्था व लेखापरीक्षकांना त्यांची बाजु मांडण्याची पुरेशी संधी देणेत यावी.

२) सहकारी संस्था दोषांची संपूर्ण दुरुस्ती करेपर्यंत, संस्थेने सादर केलेल्या "ओ" नमुन्यातील दोष दुरुस्ती अहवालावर आपले बाब निहाय अभिप्राय देणे आणि निबंधकाला सदरहू अहवाल वेळीच सादर करणे ही संबंधित लेखापरीक्षकाची जबाबदारी आहे. सदरचे पालन झाले किंवा नाही याची खात्री करण्यात यावी. सदरची पुर्तता न झाल्यास आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

३) लेखापरीक्षण अहवालामधील दोषांची दुरुस्ती करण्यास किंवा निबंधकाने दिलेल्या निदेशाप्रमाणे दोष दुरुस्ती करण्यात संस्थेने कसूर केल्यास, संबंधित संस्थेविरुद्ध कलम ८७ (४) अन्वये संबंधित निबंधकांनी असे दोष दुरुस्त करुन घेण्यासाठी उपाययोजना करावी. सदर प्रकरणी कलम ८२(४) मधील तरतुदीनुसार निबंधकाच्या मते जबाबदार सेवक / अधिकारी यांनी असे दोष दुरुस्त करण्यासाठी कसूर केला आहे, अशा संस्थांच्या एक किंवा अनेक अधिकाऱ्यांकडून प्रस्तूत उपाययोजनासाठी झालेला खर्च वसूल करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

४) संस्थेचे संबंधित अधिकारी व पदाधिकारी यांनी, त्यांचे संस्थेच्या मागील वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे कलम ७५ (२) (सात), कलम ७५(४) अन्वये सादर करणे आवश्यक आहे. कलम ७५ (५) अन्वये संस्थेच्या ज्या अधिकाऱ्यांनी किंवा समिती सदस्यांनी सदरहू उपबंधाचे पालन न करता आपले कर्तव्यात कसूर केला आहे, त्यासाठी ते अधिकारी किंवा समिती सदस्य, संस्थेचे पदाधिकारी म्हणून किंवा समितीचा सदस्य म्हणून कामकाज करण्यास आणि समितीचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास महत्तम पाच वर्षापर्यंत अनर्ह राहील, अशी तरतूद आहे. शिवाय याच तरतूदीन्वये जो अधिकारी संस्थेचा कर्मचारी आहे, त्याने प्रस्तुत उपबंधाचे अनुपालन करण्यास कसूर केल्याची बाब निदर्शनास आल्यास रु.५०००/- पर्यंत दंड भरण्याबाबत देखील तरतुद आहे.

वरील तरतुदीची अधिनियमास अभिप्रेत प्रभावी अंमलबजावणी करुन, दोष दुरूस्ती अहवाल वार्षिक साधारण सभेपुढे ठेवणेस कसुर करणाऱ्या पदनिर्देशीत पदाधिकारी, संचालक सदस्य व अधिकारी / कर्मचारी यांचेवर नैसर्गिक न्यायतत्वाने संबंधितांना उचित संधी देऊन पुढील वैधानिक कारवाई करण्यात यावी.

५) ज्या संस्था कलम ७५(२) व ७५ (४) मधील तरतुदीनुसार दोष दुरुस्ती अहवाल अनुषंगिक कार्यवाही करणार नाहीत, अशा संस्थांच्या संबंधितांनी कलम १४६ (फ) अन्वये अपराध केला असल्याचे मानुन, सर्व संबंधित कलम १४७ (फ) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे शास्तीस पात्र राहतील.

वरील तरतुदीचे उल्लंघनाबाबत संबंधीत निबंधकांनी कलम १४६, १४७ व १४८ अन्वये वेळीच पुढील कायदेशीर कार्यवाही करावी.

६) सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाच्या अनुषंगाने वेळोवेळी हेतुपुरस्सर जबाबदारी पार न पाडणारे व आपल्या कर्तव्यात कसूर करणारे संबंधित सनदी लेखापाल भागीदारी संस्था, सनदी लेखापाल, परीव्यय लेखापाल भागीदारी संस्था, परीव्यय लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षक हे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ (१) (ग) (सात) मधील तरतुदी नुसार

सहकार खात्याच्या लेखापरीक्षकांच्या नामतालिकेवरुन नाव कमी करण्यास पात्र ठरणार असल्याने, संबंधित कसुरदार लेखापरीक्षकांना त्यांची बाजु मांडण्याची पुरेशी संधी देऊन, कारवाईचा प्रस्ताव आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सहकार आयुक्त कार्यालयास वेळीच सादर करावा. तसेच सदर प्रकरणी सहकार खात्यातील लेखापरीक्षक जबाबदार असल्यास, अशा लेखापरीक्षकांविरुध्द उचित कार्यवाहीचा प्रस्ताव संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षक / विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) यांनी सक्षम प्राधिकाऱ्याकडे वेळीच सादर करावा.

**४) सर्वसाधारण सूचना :-**

१. दोष दुरुस्ती अहवालाची स्विकृती व त्यावरील पुढील कारवाईच्या अनुषंगाने दिलेल्या सविस्तर निदेशानुसार राज्यातील सर्व विभागीय स्तरीय, राज्यस्तरीय व वित्तिय सहकारी संस्थांचे दोष दुरुस्ती अहवाल छाननी कामकाज दरवर्षी प्राधान्याने पुर्ण करावयाचे आहे. उर्वरीत सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे दोषदुरूस्ती अहवालाबाबतची कार्यवाही सुध्दा वेळीच पूर्ण करणेची दक्षता घ्यावी.

२. संबंधित सर्व निबंधकांनी त्यांचे कार्यालयास प्राप्त दोष दुरुस्ती अहवाल परिपत्रकीय सुचनां नुसार संबंधित विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांना छाननी कामकाजा करिता उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही वेळोवेळी करावी.

३. वाचले क्र. ३ (वार्षिक लेखापरीक्षण नोंदवही) अन्वये सुचित केल्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी दरमहा आपले जिल्ह्याची लेखापरीक्षण पुर्ण संस्थांची लेखापरीक्षण अहवाल विषयक माहिती जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग - १ यांनी नियुक्त केलेल्या समन्वय अधिका-यास वेळीच उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

वरीलप्रमाणेच सदरहू परिपत्रकातील निर्देशाप्रमाणे लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची स्विकृती व अनुषंगीक कामकाज संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षकांनी वाचले क्र.३ मधील सुचनानुसार संबंधित निबंधक कार्यालयाकरीता नियुक्त समन्वय अधिकाऱ्याच्या मदतीने पुर्ण करावयाचे आहे. संबंधित सर्व निबंधक कार्यालयांनी आपले कार्यक्षेत्रातील सहकारी संस्थांचे दोष दुरुस्ती अहवालांवर केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती नियुक्त समन्वय अधिकारी यांना संबंधित प्रपत्रात उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही दरमहा वेळीच करावी. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी सदरचे कामकाज समन्वयाने पूर्ण करावयाचे आहे. **(सोबत प्रपत्र ५, ५(अ) व ५(ब)** )

४. जिल्हानिहाय दोषदुरुस्ती अहवालाची स्विकृती व त्यावरील पुढील कार्यवाही याबाबतच्या कामकाजाची संख्यात्मक माहिती दरमहा मासिक माहिती प्रणाली (M.I.S.) द्वारे (प्रपत्र ५, ५(अ) व ५(ब) ) जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) यांना निर्धारित मुदतीत सादर करावी. सदरची माहिती अचुक राहिल याची नोंद घ्यावी.

५. लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची स्वीकृती व दोष दुरुस्ती अहवालाची सुनिश्चिती निबंधकाच्या वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था करीत असले तरीही, आपले जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवालाचे दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त करुन घेणे व त्यावर सहकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेळोवेळी उचित कार्यवाही करणे, ही बाब जिल्हा उपनिबंधक या नात्याने सदरहू परीपत्रकामधील सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्याची व करवून घेण्याची अंतीमत: जबाबदारी संबंधित जिल्हा उपनिबंधकांची राहील.

६. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व विभागिय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) यांनी, विभागीय स्तरीय मासिक आढावा समन्वय सभांमध्ये आढावा घेऊन, आपले विभागातील सहकारी संस्थांच्या दोष दुरुस्ती अहवालावरील कार्यवाही सदरहु परीपत्रकीय सुचनांप्रमाणे होत आहे किंवा नाही याची खात्री करावी. तसेच सदर बाबतची अचुक माहिती या कार्यालयास दरमहा प्राप्त होण्याच्या दृष्टीने उचित समन्वय राखुन आवश्यक कार्यवाही करावी.

उपरोक्त सर्व सुचनांचे पालन करुनच यापुढे राज्यातील पात्र सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची स्विकृती व दोष दुरुस्ती अहवालांवरील वैधानिक कार्यवाही बाबत कामकाज करण्यात यावे. सदर सुचनांचे उल्लंघन करणारे संबंधित अधिकारी/ कर्मचारी /लेखापरीक्षक हे उचित कारवाईस पात्र राहतील. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, यांनी सदरच्या सूचना आपले कार्यक्षेत्रातील सर्व सहकारी संस्था व नामतालिकेवरील सर्व लेखापरीक्षकांच्या निर्दशनास आणुन देण्याची कार्यवाही करावी. तसेच सदरच्या सूचना सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) यांनी आपले अधिनस्त सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणून, सदर सुचनांची वेळोवेळी प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल, असे पाहावे.

**सहपत्र :-**

१. लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती छाननी अहवाल नमुना.
२. प्रपत्र ५, ५(अ) व ५(ब)

(शैलेश कोतमिरे)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत, माहिती व उचित कार्यवाहीस्तव :-**

१) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य तथा विशेष निबंधक, सह.संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५.
२) आयुक्त, वस्त्रोद्योग तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) आयुक्त, दुग्ध विकास व अतिरिक्त निबंधक महाराष्ट्र राज्य, वरळी दुध डेअरी, वरळी, मुंबई.
४) आयुक्त, मत्स्य व्यवसाय विकास व अतिरिक्त निबंधक, महाराष्ट्र राज्य, तारापोरवाला मत्स्यालय, मरीन लाईन, मुंबई.
५) आयुक्त, आदिवासी विकास व अप्पर निबंधक, सहकारी संस्था, नाशिक.
६) पणन संचालक, कृषी पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) अपर निबंधक (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) विशेष कार्य अधिकारी, लेखापरीक्षा मंडळ (पदुम), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३) सहनिबंधक (आदिवासी विकास), सहकारी संस्था, नाशिक.
१४) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
१५) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) (सर्व).
१६) सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) मुंबई.
१७) सहनिबंधक, सहकारी संस्था (पुर्व व पश्चिम उपनगरे), झोपडपट्टी पर्नविकास प्राधिकरण, मुंबई,
१८) सहनिबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई.
१९) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
२०) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, (सर्व).
२१) उपनिबंधक, सहकारी संस्था, मुबई पश्चिम उपनगरे, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, मुंबई,
२२) उपनिबंधक, सहकारी संस्था, मुबई, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.

२३) उपनिबंधक, सहकारी संस्था, (मुंबई शहर, पुर्व उपनगर व कोकण मंडळ कार्यक्षेत्र)
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/ म्हाडा, मुंबई,

२४) तालूका/ वॉर्ड उपनिबंधक/ सहायक निबंधक, सहकारी संस्था, (सर्व).

२५) सहायक निबंधक, सहकारी संस्था मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण, ठाणे.

२६) सहायक निबंधक, सहकारी संस्था झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, पुणे.

२७) दि इन्स्टीटयुट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया, WIRC, बि.के.सी., बांद्रा, मुंबई-४०००५१.

२८) दि इन्स्टीटयुट ऑफ कॉस्ट ॲन्ड वर्क्स अकौंटंटस ऑफ इंडिया, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई.

२९) अध्यक्ष/ सचिव, ऑडीटर्स कौन्सिल ॲन्ड वेलफेअर असो., पुणे.
(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना).

३०) अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य को-ऑप.ऑडीटर्स महासंघ, पुणे.
(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना).

३१) प्रमाणित लेखापरीक्षकांच्या जिल्हास्तरीय संघटना (सर्व).

३२) कार्यासन अधिकारी, सहकार आयुक्तालय, पुणे (सर्व).

३३) मा. सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव.

३४) कार्यासन अधिकारी (माहिती व तंत्रज्ञान शाखा) मुख्यालय, पुणे (कार्यालय संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव)

३५) निवड नस्ती.

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर,**

मा.अपर मुख्य सचिव (सहकार व पणन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

या कार्यालयाचे परीपत्रक जा.क्र.सआ.-१९/लेप.-३/दो.दुरुस्ती अह./ कार्यवाही/ /२०२५ दि /०८/२०२५ चे सहपत्र

## लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरुस्ती छाननी अहवाल

१. संस्थेचे नाव :-

२. लेखापरीक्षण वर्ष व कालावधी :- सन २०-- ते २०-- (कालावधी दि. /००/२०--- ते दि. /००/२०---)

३. लेखापरीक्षकाचे नाव व पदनाम :-

४. नामतालिका क्रमांक :-

५. दोष दुरूस्ती अहवाल छाननी करणा-या अधिकारी / कर्मचा-याचे नाव व पदनाम :- श्री/श्रीमती ---

### पुर्तता न झालेल्या दोषांचा तपशील

| अ.क्र. | लेखापरीक्षण अहवाल तपशील | अ.क्र. | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदाचा तपशील | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. व मुद्दा क्र. | पुर्तता न झालेल्या दोषांचा संक्षिप्त तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | भाग-अ | १ | | | |
| | | २ | | | |
| | | ३ | | | |
| | भाग-ब | १ | | | |
| | | २ | | | |
| | | ३ | | | |
| | भाग-क | १ | | | |
| | | २ | | | |
| | | ३ | | | |

(स्वाक्षरी)
दोष दुरूस्ती अहवाल छाननी करणा-या
अधिकारी /कर्मचा-याचे नाव व पदनाम

प्रपत्र क्र. 5

सन 2021-22 व सन 2022-23 अखेरचे लेखापरीक्षण अहवालानुसार सादर करावयाच्या दोषदुरूस्ती अहवालाबाबतचा आढावा. (माहे - 2023 अखेर)

| अ. क्र. | विभाग / जिल्हा | सन 2021-22 अखेरीत लेखापरीक्षण पूर्ण संस्था | सन 2022-23 अखेरीत लेखापरीक्षण पूर्ण संस्था (तक्ता क्र.2 प्रमाणे) | संस्थेने लेखापरीक्षकाकडे दोष दुरूस्ती अहवाल सादर केलेल्या संस्थांची संख्या | | संस्थेने लेखापरीक्षकाकडे दोष दुरूस्ती अहवाल सादर न केलेल्या संस्थांची संख्या | | संबंधित लेखापरीक्षकाने अभिप्राय नोंदवून निबंधकांकडे सादर केलेल्या दोष दुरुस्ती अहवाल संस्था संख्या | | संबंधित लेखापरीक्षकाने अभिप्राय नोंदवून निबंधकांकडे सादर न केलेल्या दोष दुरुस्ती अहवाल संस्था संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रकाना क्र.3 पैकी (सन 2021-22) | रकाना क्र.4 पैकी (सन 2022-23) | रकाना क्र.3 पैकी (सन 2021-22) (3-5) | रकाना क्र.4 पैकी ( सन 2022-23) (4-6) | रकाना क्र.5 पैकी (सन 2021-22) | रकाना क्र.6 पैकी ( सन 2022-23) | रकाना क्र.5 पैकी (सन 2021-22) (5-9) | रकाना क्र.6 पैकी (सन 2022-23) (6-10) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | महाराष्ट्र राज्य | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 1 | मुंबई शहर -1 | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 2 | मुंबई -2 (पूर्व उपनगर) | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 3 | मुंबई -3 (पश्चिम उपनगर) | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 4 | मुंबई शहर-4 | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 5 | म्हाडा | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 6 | एमएमआरडीए | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 7 | एसआरए | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 8 | सिडको | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| | मुंबई विभाग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 9 | ठाणे | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 10 | पालघर | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 11 | रायगड | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 12 | रत्नागिरी | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 13 | सिंधुदुर्ग | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| | कोकण विभाग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 14 | नाशिक | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 15 | अहमदनगर | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 16 | धुळे | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 17 | जळगाव | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 18 | नंदुरबार | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| | नाशिक विभाग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 19 | पुणे शहर | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 20 | पुणे ग्रामीण | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 21 | एसआरए पुणे | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 22 | सोलापूर | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| | पुणे विभाग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 23 | कोल्हापूर | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 24 | सातारा | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 25 | सांगली | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| | कोल्हापूर विभाग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 26 | औरंगाबाद | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 27 | जालना | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 28 | परभणी | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 29 | हिंगोली | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| | औरंगाबाद विभाग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 30 | लातूर | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 31 | बीड | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 32 | नांदेड | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 33 | उस्मानाबाद | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| | लातूर विभाग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 34 | अमरावती | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 35 | अकोला | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 36 | बुलढाणा | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 37 | यवतमाळ | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 38 | वाशिम | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| | अमरावती विभाग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 39 | नागपूर | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 40 | वर्धा | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 41 | भंडारा | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 42 | गोंदिया | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 43 | चंद्रपूर | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| 44 | गडचिरोली | | 0 | | | 0 | 0 | | | 0 | |
| | नागपूर विभाग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | महाराष्ट्र राज्य | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |

प्रपत्र क्र. ५ (अ)

निबंधकाकडे प्राप्त झालेल्या दोषदुरुस्ती अहवालाबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा (माहे २०२३ अखेर)

| अ. क्र. | विभाग / जिल्हा | संबंधित लेखापरीक्षकाने अभिप्राय नोंदवून निबंधकाकडे सादर केलेल्या दोष दुरुस्ती अहवाल संस्था संख्या | | दोष दुरुस्ती अहवाल प्राप्तीनंतर, निबंधकाने कलम ८२ अन्वये संस्थेच्या कामकाजातील दोष व नियमबाह्यतेची पूर्तता मान्य केलेल्या संस्थांची संख्या (निर्देश देणे आवश्यक नसलेल्या संस्था) | | दोष दुरुस्ती अहवाल प्राप्तीनंतर, निबंधकाने कलम ८२ अन्वये दोष दुरुस्ती अहवालामधील पूर्तता न केलेल्या दोषाबाबत निर्देश दिलेल्या संस्थांची संख्या | | कलम ८७ (४) प्रमाणे कार्यवाही केलेल्या संस्थांची संख्या | | निबंधकाने कोणतीही कारवाई न केलेल्या संस्था संख्या | | निबंधकाने दोष दुरुस्ती अहवाल सादर न करणाऱ्या संस्थांविरुद्ध केलेल्या कारवाईचा तपशील: अधिनियमातील कलम १४६ अंतर्गत अपराधाखाली कारवाई केलेल्या संस्थांची संख्या | | अधिनियमातील कलम १४७ अंतर्गत कलम १४८ अन्वये शास्ती केलेल्या संस्थांची संख्या | | दोष दुरुस्ती अहवाल अद्याप सादर केलेल्या नसणाऱ्या संस्थांविरुद्ध निबंधकाने कारवाई न केलेल्या प्रलंबित संस्था संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०२१-२२ | सन २०२२-२३ | रकाना क्र.३ पैकी (सन २०२१-२२) | रकाना क्र.४ पैकी (सन २०२२-२३) | रकाना क्र.३ पैकी (सन २०२१-२२) | रकाना क्र.४ पैकी (सन २०२२-२३) | रकाना क्र.३ पैकी (सन २०२१-२२) | रकाना क्र.४ पैकी (सन २०२२-२३) | रकाना क्र.३ पैकी (सन २०२१-२२) | रकाना क्र.४ पैकी (सन २०२२-२३) | सन २०२१-२२ पैकी | सन २०२२-२३ पैकी | सन २०२१-२२ पैकी | सन २०२२-२३ पैकी | सन २०२१-२२ पैकी | सन २०२२-२३ पैकी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | महाराष्ट्र राज्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १ | मुंबई शहर -१ | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| २ | मुंबई -२ (पूर्व उपनगर) | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ३ | मुंबई -३ (पश्चिम उपनगर) | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ४ | मुंबई शहर -४ | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ५ | म्हाडा | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ६ | [illegible] | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ७ | [illegible] | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ८ | सिडको | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| | मुंबई विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | ठाणे | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| १० | पालघर | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ११ | रायगड | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| १२ | रत्नागिरी | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| १३ | सिंधुदुर्ग | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| | कोकण विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १४ | नाशिक | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| १५ | अहमदनगर | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| १६ | धुळे | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| १७ | जळगाव | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| १८ | नंदुरबार | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| | नाशिक विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १९ | पुणे शहर | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| २० | पुणे ग्रामीण | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| २१ | [illegible] पुणे | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| २२ | सोलापूर | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| | पुणे विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २३ | कोल्हापूर | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| २४ | सातारा | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| २५ | सांगली | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| | कोल्हापूर विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २६ | औरंगाबाद | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| २७ | जालना | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| २८ | परभणी | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| २९ | हिंगोली | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| | औरंगाबाद विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३० | लातूर | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ३१ | बीड | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ३२ | नांदेड | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ३३ | उस्मानाबाद | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| | लातूर विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३४ | अमरावती | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ३५ | अकोला | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ३६ | बुलढाणा | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ३७ | यवतमाळ | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ३८ | वाशिम | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| | अमरावती विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३९ | नागपूर | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ४० | वर्धा | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ४१ | भंडारा | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ४२ | गोंदिया | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ४३ | चंद्रपूर | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| ४४ | गडचिरोली | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| | नागपूर विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | महाराष्ट्र राज्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

प्रपत्र क्र. 5 (ब)

दोष दुरुस्ती अहवाल सादर न करणाऱ्या संस्थांवर निबंधकाने केलेल्या कारवाईचा आढावा. (माहे - 2023 अखेर)

| अ. क्र. | विभाग / जिल्हा | लेखापरीक्षकाकडे दोष दुरुस्ती अहवाल सादर न केलेल्या संस्थांची संख्या (नमुना क्र.5 मधील रकाना क्र. 7 व 8 प्रमाणे) | | निबंधकाने दोष दुरुस्ती अहवाल सादर न करणाऱ्या संस्थांविरुद्ध केलेल्या कारवाईचा तपशिल: दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी नोटीस दिली असल्यास | | अधिनियमातील कलम 146 अंतर्गत अपराधाखाली कारवाई केलेल्या संस्थांची संख्या | | अधिनियमातील कलम 147 अंतर्गत कलम 148 अन्वये शास्ती केलेल्या संस्थांची संख्या | | दोष दुरुस्ती अहवाल अद्याप सादर केलेला नसतानाही निबंधकाने कारवाई न केलेल्या शिल्लक संस्था संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन 2021-22 पैकी | सन 2022-23 पैकी | सन 2021-22 पैकी | सन 2022-23 पैकी | सन 2021-22 पैकी | सन 2022-23 पैकी | सन 2021-22 पैकी | सन 2022-23 पैकी | सन 2021-22 पैकी | सन 2022-23 पैकी |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | **महाराष्ट्र राज्य** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 1 | मुंबई शहर -1 | 0 | 0 | | | | | | | | |
| 2 | मुंबई -2 (पूर्व उपनगर) | 0 | 0 | | | | | | | | |
| 3 | मुंबई -3 (पश्चिम उपनगर) | 0 | 0 | | | | | | | | |
| 4 | मुंबई शहर-4 | 0 | 0 | | | | | | | | |
| 5 | म्हाडा | 0 | 0 | | | | | | | | |
| 6 | एमएमआरडीए | 0 | 0 | | | | | | | | |
| 7 | एसआरए | 0 | 0 | | | | | | | | |
| 8 | सिडको | 0 | 0 | | | | | | | | |
| | **मुंबई विभाग** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | ठाणे | 0 | 0 | | | | | | | | |
| 10 | पालघर | 0 | 0 | | | | | | | | |
| 11 | रायगड | 0 | 0 | | | | | | | | |
| 12 | रत्नागिरी | 0 | 0 | | | | | | | | |
| 13 | सिंधुदुर्ग | 0 | 0 | | | | | | | | |
| | **कोकण विभाग** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | नाशिक | 0 | 0 | | | | | | | | |
| 15 | अहमदनगर | 0 | 0 | | | | | | | | |
| 16 | धुळे | 0 | 0 | | | | | | | | |
| 17 | जळगाव | 0 | 0 | | | | | | | | |
| 18 | नंदुरबार | 0 | 0 | | | | | | | | |
| | **नाशिक विभाग** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 19 | पुणे शहर | 0 | 0 | | | | | | | | |
| 20 | पुणे ग्रामीण | 0 | 0 | | | | | | | | |
| 21 | पिं.का. पुणे | 0 | 0 | | | | | | | | |
| 22 | सोलापूर | 0 | 0 | | | | | | | | |
| | **पुणे विभाग** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 23 | कोल्हापूर | 0 | 0 | | | | | | | | |
| 24 | सातारा | 0 | 0 | | | | | | | | |
| 25 | सांगली | 0 | 0 | | | | | | | | |
| | **कोल्हापूर विभाग** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 26 | औरंगाबाद | 0 | 0 | | | | | | | | |
| 27 | जालना | 0 | 0 | | | | | | | | |
| 28 | परभणी | 0 | 0 | | | | | | | | |
| 29 | हिंगोली | 0 | 0 | | | | | | | | |
| | **औरंगाबाद विभाग** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 30 | लातूर | 0 | 0 | | | | | | | | |
| 31 | बीड | 0 | 0 | | | | | | | | |
| 32 | नांदेड | 0 | 0 | | | | | | | | |
| 33 | उस्मानाबाद | 0 | 0 | | | | | | | | |
| | **लातूर विभाग** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 34 | अमरावती | 0 | 0 | | | | | | | | |
| 35 | अकोला | 0 | 0 | | | | | | | | |
| 36 | बुलढाणा | 0 | 0 | | | | | | | | |
| 37 | यवतमाळ | 0 | 0 | | | | | | | | |
| 38 | वाशिम | 0 | 0 | | | | | | | | |
| | **अमरावती विभाग** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 39 | नागपूर | 0 | 0 | | | | | | | | |
| 40 | वर्धा | 0 | 0 | | | | | | | | |
| 41 | भंडारा | 0 | 0 | | | | | | | | |
| 42 | गोंदिया | 0 | 0 | | | | | | | | |
| 43 | चंद्रपूर | 0 | 0 | | | | | | | | |
| 44 | गडचिरोली | 0 | 0 | | | | | | | | |
| | **नागपूर विभाग** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | **महाराष्ट्र राज्य** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |